# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १६**

**(सभावृत्तांत)**

दिनांक–०५/०७/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार,दिनांक ०५/०७/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ढंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.चंद्रकांत इंदलकर-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत, मा.खोराटे-सहाय्यक आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.रत्नपारखी, मा.थोरात, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.घुबे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.बहुरे, मा.गाडेकर-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

(नवनियुक्त सहा.आयुक्त श्री.विजय एकनाथ खोराटे यांचे स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आणि त्यानंतर मा.सहा.आयुक्त यांनी मा.सभागृहास त्यांचा परिचय करुन दिला.)

-------------

अ) दिनांक १४/०६/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक २१/०६/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १४) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ३०) | माजी सैनिकांसाठी विनाशुल्क इमारत उपलब्ध करुन देणेबाबत-मा.लक्ष्मण उंडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३१) | मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.४८४ दि.७/६/२०१७ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३२) | पशुजन्म नियंत्रण कार्यक्रम राबविणेकामी मे.पिपल फॉर ऍनिमल, पुणे या संस्थेस मुदतवाढ देणेबाबत... |
| विषय क्रमांक ३३) | श्री.अनिल गुलाबराव कदम, मुख्यसमन्वयक, आपत्ती व्यवस्थापन विभाग यांचे एकत्रित मानधनावरील नेमणुकीस मुदतवाढ व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत... |

-----------

**निर्णय –<u>अ) पी.जी. पोर्टलवरील तक्रारीबाबत –</u>**

**१)** स्थायी समिती प्रामाणिकपणे काम करणा-या अधिका-यांच्या बरोबर आहे आणि यापुढेही बरोबर राहणार आहोत.

**२)** तक्रारदार व्यक्ती गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली आहे. खंडणीचे गुन्हे, खून, अपहरण, जागा बळकावणे, बेकायदा शस्त्र बाळगणे, दंगल माजवणे अश्या मोठ्या गुन्ह्यांची जंत्री असलेल्या व्यक्तीने पी.जी.पोर्टलवर तक्रार दाखल केली आहे. मा.लांडे, मुख्यलेखापाल हे नियम दाखवून काम का करतात म्हणून त्यांना दमबाजी होते. तक्रारदारास आणखी आठ दिवस मुदत द्यावी. परंतू त्याने केलेले आरोप सिद्ध झाले नाहीतर त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. पी.जी.पोर्टलवर केलेल्या तक्रारीबाबतीत प्रशासनाने कारवाई करावी. विषय अत्यंत संवेदनशील असल्याने यात कोणालाही सूट देण्यात येऊ नये.

**३)** मा.मुख्यलेखापाल व मा.शहर अभियंता यांना सूचना/आदेश आहेत की, महापालिकेतील ज्या-ज्या वॉर्डमध्ये मॉडेल वॉर्ड म्हणून आजपर्यंत झालेली सगळी कामे (टेक्निकल, स्थापत्य विषयक इ.कामे) यांची चौकशी ही आयआयटी,पवई यांच्याकडूनच करुन घ्यावी. या संदर्भातील सगळ्या फाईल्स आयआयटी,पवई यांना पुरविण्यात याव्यात. याकरिता जी फी आकारली जाते, त्याचा विषय स्थायी समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात यावा.

**<u>ब) कंत्राटी कामगारांच्या पी.एफ. संदर्भात</u> –**

**१)** महानगरपालिकेने तीन कोटी रुपये हे या कामगारांच्या पी.एफ.करिता दिले आहेत. निविदेमध्ये कामगारांचा पी.एफ. भरणेबाबत अटी/शर्तीचा अंतर्भाव असूनदेखील ठेकेदाराकडून आजही पी.एफ. भरला जात नसल्याचे दिसून येते आहे. ही अट वगळून आजपर्यंत काम केले गेले आहे. हा कामगार हा समाजातील सर्वात खालचा स्तर आहे. त्यामुळे प्रभाग अधिका-यांनी यात वैयक्तिक लक्ष घातले पाहिजे.

**२)** किती ठिकाणी ड्रेनेज वाहतेय, किती ठिकाणी कचरा उचलला गेला नाही याची पाहणी प्रभाग अधिका-यांनी फिल्डवर जाऊन केली पाहिजे. केवळ हाताखालील कर्मचा-यांच्या भरवशावर काम करणे अशी कामाची पद्धत यापुढे चालणार नाही.

**३)** प्रभाग अधिका-यांनी फिल्डवर किती तास काम केले पाहिजे याबाबत प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावा.

**४)** पी.एफ. कार्यालयाकडून कॅम्प आयोजित केले जातात. यासाठी पी.एफ. कार्यालयाशी पत्रव्यवहार करुन तसे कॅम्प आयोजित करावेत. किंवा एजन्सी नेमावी. आणि कंत्राटी कामगारांचा पी.एफ. भरला गेला आहे का नाही याची रेकॉर्ड तपासणीचे काम पूर्ण करुन घ्यावे. या कामगारांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळालेच पाहिजेत. प्रशासनाने यात जातीने लक्ष घालून निर्णय घ्यावा.

**५)** मे.स्फूर्ती बेरोजगार संस्था या संस्थेने पी.एफ. न भरता खोटी चलने सादर करुन महापालिकेची फसवणूक केली. कामगारांना पी.एफ.ची रक्कम आजपर्यंत मिळालेली नाही. म्हणून या संस्थेवर त्वरित फौजदारी खटला दाखल करावा. अ प्रभाग – श्री.व्यंकटेश्वरा बेरोजगार संस्था, ब प्रभाग – सदगुरु स्वयंरोजगार सेवा सहकारी सोसायटी, क प्रभाग – पिंपरी चिंचवड अपंग स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, इ प्रभाग – देव स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था या ४ संस्था आणि मे.स्फूर्ती बेरोजगार संस्था यांनी जानेवारीपासूनचा पी.एफ. भरल्याचा दिसून येत नाही. या संस्थांवर फौजदारी खटला दाखल करावा.

**६)** डिसिल्व्हा नावाच्या ठेकेदाराने कामगारांना दोन/तीन महिन्यांपासून पगार दिलेला नाही. कचरा वेळेवर उचलला जात नाही. याबाबत सन्मा.सदस्यांनी जी तक्रार मांडली आहे, त्यावर प्रभाग अधिका-यांनी त्वरित कार्यवाही करावी.

**<u>क) जीएसटी बाबत –</u>** सन्मा.नगरसदस्यांकरिता कार्यशाळा आयोजित करावी.

**<u>ड) स्ट्रक्चरल ऑडीट करणेबाबत -</u>** पीसीएमसी कॉलनी वसाहत व भाटनगर वसाहत, चाळीतील घरे, रस्त्याच्या कडेला मोडकळीस आलेली घरे याचे स्ट्रक्चरल ऑडीट करावे.

----------

ठराव क्रमांक – ५७९ विषय क्रमांक – १
दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – दक्षता व नियंत्रण कक्ष
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दवनि/कावि/२/८३/२०१७ दि.२२/०५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचे तर्फे प्रो.बी.जी.बिराजदार व प्रो.एस.एन.सपाली यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगवी स्मशानभूमीत पर्यावरणपूरक गॅस शवदाहिनी बसविणेच्या कामा बाबतचा तज्ञ आर्थिक व तांत्रिक सल्ला देणेसाठी अंदाजपत्रकीय दराच्या १%+

सेवाकर एवढी सल्लागार फी र.रू.१,३६,८००/- (अक्षरी र.रू.एक लाख छत्तीस हजार आठशे फक्त) मा.संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांस अगावु अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५८० | विषय क्रमांक – २

दिनांक – ०५/०७/२०१७ | विभाग – स्थापत्य

सूचक – मा.उत्तम केंदळे | अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२१५/१७ दि.२२/६/२०१७

विषय - वॉर्ड क्र.२४ (नवीन प्र.क्र.२९) इंद्रायणीनगर से.नं.१ महाराष्ट्र कॉलनी शेजारी मोकळा भुखंड क्र.३ मध्ये पोहण्याचा तलाव बांधणेबाबत...

विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय–१)** संबंधित विभागाने पोहण्याचा तलाव पीपीपी तत्वावर बांधल्यास कसा फायदेशीर होईल याचा सविस्तर अभ्यास करुन प्रस्ताव तयार करावा. प्रशासनाने पीपीपीचे मॉडेल आणावे.

**२)** शहरातील एकूण १२ पोहण्याच्या तलावांचा देखभाल दुरुस्ती खर्च हा उत्पन्नापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते आहे. पोहण्याचे तलाव पावसाळ्यात चालू आणि उन्हाळ्यात बंद असतात. शुक्रवार,शनिवार आणि रविवार असे आठवड्यातील तीन दिवस पोहण्याचे तलाव बंद असतात. कधी पाणी,लाईट नसते, कधी पाण्यातील एचपीचे प्रमाण बरोबर नसते. तरी देखभालीसाठी महापालिका दरवर्षी प्रचंड प्रमाणात खर्च करते.

-------------

ठराव क्रमांक – ५८१ | विषय क्रमांक – ३

दिनांक – ०५/०७/२०१७ | विभाग – प्रशासन

सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/९/कावि/४४३/२०१७ दि.२२/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

श्री.पारधे स्वप्निल विजय, हे लिपिक पदावरील नियुक्तीनंतरच्या ३ वर्षांतील परिविक्षाधीन कालावधीमध्ये कामकाजाचा अपेक्षीत दर्जा प्राप्त करु शकले नाहीत, नियुक्ती आदेशातील अटीनुसार त्यांनी विहित कालावधीमध्ये व तदनंतर मुदतवाढ देऊनही टंकलेखन अर्हता प्राप्त केलेली नसल्याने, तसेच अनाधिकाराने लेखापाल यांचे युजर आय डी व पासवर्ड वापरुन ई टेंडरिंग नोंदणी प्रमाणपत्राची मुदत संपलेली असतांना, ठेकेदाराचे डिजीटल कीचे नुतनीकरण केल्याचे गंभीर गैरवर्तन चौकशीमध्ये शाबीत झाले आहेत. त्याअनुषंगाने त्यांनी सादर केलेले अभिवेदन असमाधानकारक आहे. तसेच परिविक्षाधीन कालावधीत त्यांना करण्यात आलेली दंडात्मक शास्ती व कामकाज असाधानकारक असल्याचा विभाग प्रमुखांचा अहवाल या बाबी विचारात घेता, श्री.पारधे यांनी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तींचा, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९, तसेच शासन निर्णय क्र. अकंपा-१०९५/प्र.क्र.३४-अ/आठ दि.२३/१०/१९९६ मधील ५ (ड) व (ई) चा भंग केल्याने, श्री.पारधे यांना दिनांक २५/०४/२०१७ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून काढून टाकण्यात आलेले आहे. नोकरीच्या अटी किंवा शर्तींना अनुसरुन केलेली सेवासमाप्ती शिक्षेत मोडत नाही आणि म्हणून अशा सेवासमाप्ती पुर्वी

विभागीय चौकशीची आवश्यकता नाही (संदर्भ विभागीय चौकशी नियम पुस्तिका परिच्छेद क्र.३.९) या बाबी विचारात घेवून श्री.पारधे यांचे असमाधानकारक कामकाजाबाबत त्यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार संधी देणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेऊन त्यांची खातेनिहाय चौकशी करण्यात आलेली आहे. सदरची वस्तुस्थिती विचारात घेता श्री.पारधे स्वप्निल विजय यांचेवर महापालिका सेवेतून काढून टाकण्याची केलेली कार्यवाही योग्य व कायदेशीर असल्याचे प्रस्तावित केले असले तरी श्री.पारधे स्वप्निल विजय, लिपिक यांची कौटुंबिक परिस्थिती विचारात घेता व मानवतेच्या दृष्टीकोणातून श्री.पारधे स्वप्निल विजय यांना महापालिका आस्थापनेवरील गट-ड मधील पदावर पुर्ननेमणूक देऊन रुजू करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**निर्णय** - श्री.पारधे स्वप्निल विजय, लिपिक यांना गट-ड मधील पदावर पुर्ननेमणूक देऊन रुजू करुन घ्यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५८२ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – क्रीडा
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- १) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ११ दिनांक २६/०५/२०१७ नुसार
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४८९ दि.०७/०६/२०१७
३) मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/४/कावि/९४४/२०१७, दिनांक ०५/०७/२०१७

विषय - मे.वरदायिनी एन्टरप्रायजेस, चिंचवड १९ यांना यमुनानगर जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाजाबाबत...

उपरोक्त संदर्भ क्र.२ चे ठरावान्वये यापूर्वी सदर विषयास मान्यता मिळाली असलेने नगरसचिव यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.४ कामीचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५८३ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – क्रीडा
सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- १) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १२ दिनांक २६/०५/२०१७ नुसार
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९० दि.०७/०६/२०१७
३) मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/४/कावि/९४४/२०१७, दिनांक ०५/०७/२०१७

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हुतात्मा चापेकर सार्वजनिक वाचनालय व श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय या दोन्ही वाचनालयांकरिता पुस्तक खरेदी करणेबाबत...

उपरोक्त संदर्भ क्र.२ चे ठरावान्वये यापूर्वी सदर विषयास मान्यता मिळाली असलेने नगरसचिव यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.५ कामीचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५८४ विषय क्रमांक – ६

दिनांक – ०५/०७/२०१७

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- १) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १३ दिनांक २६/०५/२०१७ नुसार

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९१ दि.७/६/२०१७

३) मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/४/कावि/९४४/२०१७, दिनांक ०५/०७/२०१७

विषय - मनपाची छत्रपती शाहु व्यायामशाळा, प्रेमलोक पार्क ही व्यायामशाळा चंद्रकांत मित्र मंडळ, दळवीनगर या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत...

उपरोक्त संदर्भ क्र.२ चे ठरावान्वये यापूर्वी सदर विषयास मान्यता मिळाली असलेने नगरसचिव यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.६ कामीचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५८५ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०५/०७/२०१७

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- १) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १५ दिनांक २६/०५/२०१७ नुसार

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९२ दि.७/६/२०१७

३) मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/४/कावि/९४४/२०१७, दिनांक ०५/०७/२०१७

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची तानाजी गावडे " व्यायामशाळा, प्रभाग क्र.१८ ही सरदार गावडे प्रतिष्ठान या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत...

उपरोक्त संदर्भ क्र.२ चे ठरावान्वये यापूर्वी सदर विषयास मान्यता मिळाली असलेने नगरसचिव यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.७ कामीचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५८६ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०५/०७/२०१७

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- १) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १६ दिनांक २६/०५/२०१७ नुसार

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९९ दि.१४/६/२०१७

३) मा.नगरसचिव यांचे पत्र क्र.नस/४/कावि/९४४/२०१७, दिनांक ०५/०७/२०१७

विषय - संत तुकारामनगर येथील संत तुकाराम महाराज पुतळया मागील महानगरपालिकेची व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत...

उपरोक्त संदर्भ क्र.२ चे ठरावान्वये यापूर्वी सदर विषयास मान्यता मिळाली असलेने नगरसचिव यांनी विषयपत्र मागे घेणेबाबत केलेली विनंती मान्य करुन विषय क्र.८ कामीचा प्रस्ताव त्यांनी मागे घेणेस त्यांस परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५८७ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०५/०७/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १७ दिनांक ०९/०६/२०१७ नुसार

मनपाच्यावतीने पवनानगर, चिंचवड येथे स्व.दत्तात्रय मरळ उद्यान ही व्यायामशाळा चालविली जाते. मनपाची स्व.दत्तात्रय मरळ उद्यान व्यायामशाळा, पवनानगर चिंचवड ही व्यायामशाळा शंभूराजे मर्दानी खेळ विकास मंच, पुणे ही संस्था ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची स्व.दत्तात्रय मरळ उद्यान व्यायामशाळा, पवनानगर चिंचवड ही व्यायामशाळा शंभूराजे मर्दानी खेळ विकास मंच चिंचवड, पुणे – ३३ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- (अक्षरी र.रू. दोन हजार फक्त) मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५८८ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०५/०७/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- १) मा.सचिन भोसले, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १८ दिनांक ०९/०६/२०१७ नुसार

खिंवसरा पाटील व्यायामशाळा थेरगाव ही नागरिकांना व्यायामासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु त्याचा उपयोग नागरिकांना होत नसून प्रशिक्षक नसल्या कारणाने तिथे कोणताही खेळाडू येत नाही. तरी सदर व्यायामशाळा आनंदपार्क मित्रमंडळ, थेरगांव यांना ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- (अक्षरी र.रू. दोन हजार फक्त) मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५८९ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०५/०७/२०१७

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १९ दिनांक ०९/०६/२०१७ नुसार

मनपाच्यावतीने निगडी प्राधिकरण येथील बाहूबली व्यायामशाळा ही चालविली जाते. सदरची व्यायामशाळा निसर्गरत्न मित्रमंडळ, वाल्हेकरवाडी, चिंचवड पुणे ३३ या मंडळास ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची बाहुबली व्यायामशाळा निसर्गरत्न मित्रमंडळ वाल्हेकरवाडी, चिंचवड पुणे ३३ या मंडळास ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- (अक्षरी र.रू.दोन हजार फक्त) मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेची मागणी असलीतरी सदरची व्यायामशाळा निसर्गरत्न मित्रमंडळ, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे-३३ यांच्याऐवजी साथी जी.ए. इनामदार स्पोर्टस अकादमी, तुळजाई वस्ती, आकुर्डी, पुणे यांना पाच वर्षांसाठी दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- (अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९० विषय क्रमांक – १२

दिनांक – ०५/०७/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक २० दिनांक ०९/०६/२०१७ नुसार

मनपाची छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, व्यायामशाळा से.२६, प्राधिकरण, आकुर्डी ही व्यायामशाळा नवनाथ मित्र मंडळ, आकुर्डी गाव पुणे ४११ ०३५ ही संस्था ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. तरी मनपाची छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, व्यायामशाळा से.२६, प्राधिकरण, आकुर्डी ही व्यायामशाळा नवनाथ मित्र मंडळ, आकुर्डी गाव पुणे ४११ ०३५ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/-(अक्षरी र.रू. दोन हजार फक्त) मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९१ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३२३/२०१७ दि.२३/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र. १२/३/२०१६-१७ अन्वये रक्षक चौक ते औंध उरो रुग्णालय येथील डी.पी.रस्त्यातील मुख्य गुरुत्वनलिका शिफ्ट करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे. प्रांजल कोर्पोरेशन निविदा रक्कम रू.९३,३६,६७८/- (अक्षरी र.रू.त्र्याण्णव लाख छत्तीस हजार सहाशे अठ्ठ्याहत्तर फक्त) पेक्षा ६.१०% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.९२,०५,४९७/-पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९२ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/३२४/२०१७ दि.२३/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पाणीपुरवठा विभागाकडील ई-निविदा नोटीस क्र. १५/२/२०१६-१७ अन्वये जलशुद्धीकरण केंद्र से.२३ करीता ३४३ मे.टन पावडर पॉली अॅल्युमिनियम क्लोराईड खरेदीकामी वृत्तपत्र तसेच मनपा वेबसाईटवर निविदा नोटीस प्रसिद्ध करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा अटी व

शर्तीनुसार पात्र असलेल्या 03 निविदा दि.03/10/2015 रोजी निविदा समितीपुढे उघडल्या असून प्रस्तावात नमूद पैकी मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांची र.रू.३१,३५०/- प्र.मे.टनदराची निविदा लघुत्तम निविदा आहे. जलशुद्धीकरणाचे प्रक्रियेमध्ये पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड हा घटक अत्यंत महत्वाचा असून त्याचा पुरवठा न चुकता अखंडीतपणे जलशुद्धीकरण केंद्रास होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्याचा शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होवू शकतो. यासाठी सदर पुरवठ्याकामी एकावेळी २ एजन्सीज मनपाचे हाताशी असणे गरजेचे असलेने सदर निविदेतील शर्त क्र.11 नुसार सदरची खरेदी 60:40 या प्रमाणात म्हणजेच 1st Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या 60 %व 2nd Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या 40% परिमाण 1st Lowest ठेकेदाराच्या दराने खरेदी करावयाचे आहे. सदर अटीनुसार एकूण परिमाणाच्या 60% प्रमाणे मे.एस.व्ही.एस. केमिकल कॉर्पोरेशन यांचेकडून २०६ मे.टन पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव अलाहिदा सादर करणेत आलेला आहे. व उर्वरित ४०% पुरवठा करणेसाठी निविदा शर्त क्र.11 नुसार ठेकेदार मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांना आपण 1st Lowest ठेकेदाराच्या दराने म्हणजेच र.रु.३१,३५०/- प्र.मे.टन दराने पुरवठा करणेस तयार आहात का? याबाबत पत्राद्वारे विचारणा केली असता त्यांनी दि.०५/०६/२०१७ चे पत्रान्वये र.रु.३१,३५०/- प्र.मे.टन दराने पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईडचा पुरवठा करणेस तयार असलेबाबत कळविलेले आहे. तरी 1st Lowest ठेकेदाराच्या दराने म्हणजेच र.रू.३१,३५०/- प्र.मे.टन प्रमाणे 2nd Lowest ठेकेदार मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांचेकडून 40% परिमाण म्हणजेच १३७ मे.टन पावडर पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड (अपेक्षित खर्च रू.४२,९४,९५०/-) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९३ | विषय क्रमांक – १५
दिनांक – ०५/०७/२०१७ | विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.वैशाली काळभोर | अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/५४९/२०१७ दि.२३/६/२०१७

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९४ | विषय क्रमांक – १६
दिनांक – ०५/०७/२०१७ | विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ | अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/४/कावि/२३१/२०१७ दि.२७/६/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निविदा नो.क्र.२२/२०१६-१७ मधील अ.क्र.४ अन्वये मनपा प्रशासकीय इमारतीमधील विविध सभागृहातील ध्वनीक्षेपण यंत्रणेचे आवश्यकतेनुसार नुतणीकरण करणेकामी मे.विमलाई इलेक्ट्रीक कार्पोरेशन नि.र.रू.७,५३,१३५/- (अक्षरी र.रू.सात लाख त्रेपन्न हजार ऐकशे पस्तीस फक्त) दर १८.०१% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून

कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९५ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – स्वच्छ महाराष्ट्र/भारत अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्वभाअक/३/कावि/९६/२०१७ दि.२७/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय गुणवत्ता परिषदेला (QCI) ला अदायगी करावी लागणारी रक्कम ही शासनाकडुन अनुदान स्वरुपात मिळणा-या क्षमता बांधणी व प्रशासकीय सेवा शुल्क या मधुन खर्च करणेबाबत सूचित केलेले आहे. सन १७-१८ चे अंदाजपत्रकात या लेखाशिर्षावर रक्कम रु.३०,००,०००/- तरतुद करणेत आलेली असुन सदरचा खर्च या तरतुदीमधुन करता येणे शक्य आहे. होणारा खर्च अनुदान स्वरुपात केंद्र व राज्य सरकार यांचेकडुन मागणी करुन मनपा फंडात जमा करता येईल. त्यानुसार केंद्रशासनाने नेमलेल्या भारतीय गुणवत्ता परिषद (QCI) या संस्थेला अदायगी करावयाच्या रक्कम रु.१,९८,०००/-(अक्षरी रक्कम रु.एक लाख अठठयाण्ण्व हजार फक्त) व त्यावरील कर या सह येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९६ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/४९७/१७ दि.२७/६/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६७/८/२०१६-१७ प्रभाग क्र.८ मध्ये इमारतींची स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेकामी M/s.HARSHADA ENTERPRISES नि.र.रु.१३,५१,५४५/- (अक्षरी र.रू.तेरा लाख ऐकावन्न हजार पाचशे पंचेचाळीस फक्त) पेक्षा १३.०१% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१२,३४,४९४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९७ | विषय क्रमांक – १९
दिनांक – ०५/०७/२०१७ | विभाग – स्थापत्य बीआरटीएस
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे | अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कावि/बीआरटीएस/२८५/२०१७ दि.२८/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावर बांधावयाच्या बस स्टेशनच्या जागेची पाहणी केली आहे. तसेच या रस्त्यावर पुर्वी बांधलेल्या बस स्टेशनची उर्वरीत कामे करणेची पाहणी केली असून सदर कामे करणेसाठी मनपाच्या चालू प्रचलित दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर अंदाजपत्रक तयार करणे, निविदापूर्व कामे करणे व निविदापश्चात साईटवर प्रत्यक्ष काम करुन घेणे या कामी प्रकल्प सल्लागार यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. अशा प्रकारची मनपाची कामे करणेचा अनुभव असलेले मे.क्रिएशन इंजि.प्रा.लि. यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. मनपाचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक-३ मधील जेएनएनयूआरएम अंदाजपत्रक-(५) बीआरटीएस रस्त्याची अनुषंगिक कामे करणे या लेखाशिर्षावर पानांक ६६५ अ.क्र. १६ वर काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावर बीआरटीएस बस स्टेशनची उर्वरीत कामे करणे या कामी र.रु. १५.० कोटी अंदाजपत्रकीय रक्कम असुन याकामी र.रु. २.० कोटी तरतुद आहे. तरी काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावर बीआरटीएस बस स्टेशनची उर्वरीत कामे करणे याकामी मे.क्रिएशन इंजि. प्रा.लि. यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणुक करणे व मनपाच्या मान्य व प्रचलित दरानुसार प्रकल्प सल्लागार यांना निविदा रक्कमेच्या २.३५% (निविदा पुर्व ०.९०%व निविदा पश्चात १.४५%) अधिक सेवा कर अशी फी अदा करावी लागणार आहे. तरी अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणारे मे.क्रिएशन इंजि. प्रा.लि. यांची काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावर बीआरटीएस बस स्टेशनची उर्वरीत कामे करणे याकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन नेमणुक करणेस व निविदा रक्कमेच्या २.३५% (निविदा पुर्व ०.९०%व निविदा पश्चात १.४५%) अधिक सेवा कर अशी फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९८ | विषय क्रमांक – २०
दिनांक – ०५/०७/२०१७ | विभाग – सुरक्षा
सूचक – मा.हर्षल ढोरे | अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/५९५/२०१७ दि.२७/०६/२०१७

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागामार्फत वाय.सी.एम.एच. येथे नियुक्त केलेल्या मे.पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडाळाकडील सुरक्षा रक्षक कर्मचारी यांना किमान वेतन कायद्यानुसार ०१/०१/२०१७ पासून महागाई भत्ता/ विशेष भत्ता र.रु.३,२५६.२०/- प्रमाणे होणारी वेतन वाढ लागू करुन प्रती कर्मचारी प्रती महा एकूण र.रु.१६,६७८.२१/- (अक्षरी र.रू. सोळा हजार सहाशे अठ्याहत्तर पैसे एकवीस फक्त) प्रमाणे वेतन अदा करणेस व त्यापोटी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५९९ विषय क्रमांक – २१
दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१८९/२०१७ दि.६/१/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.15/2016-17 मधील अ.क्र.11 अन्वये सन २०१६-१७ करीता अ क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील कारंजे व धबधबे यांचे चालन व देखभाल दुरूस्ती करणेकामी मे. एन सी वाय एंटरप्रायजेस नि.र.रू.3,48,532/- (अक्षरी र.रू.तीन लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे बत्तीस फक्त) पेक्षा 2.97% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६०० विषय क्रमांक – २२
दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/८२३/२०१७ दि.२८/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे विविध विभागांकडील युपीएसचा बॅकअप कायमस्वरुपी कार्यरत ठेवण्यासाठी उत्पादित कंपनीकडील बॅटरी खरेदीकामी ऑनलाईन निविदा क्र.८२/२०१६-१७ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.पॉवरटेक सिस्टीम्स, पुणे यांचेकडून आवश्यक युपीएस बॅटरी खरेदीकामी एकूण र.रु.२२,५९,०००/- (अक्षरी र.रु.वाबीस लाख एकोणसाठ हजार फक्त) चे खर्चास व त्यांचे बरोबर करारनामा करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६०१ विषय क्रमांक – २३
दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/५८५/२०१७ दि.२९/०६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०४/२०१४-१५ अन्वये अ क्षेत्रिय कार्यालयातंर्गत प्रभाग क्र.१४ व १७ मधील रस्ते दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणेकामी मे.तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता मिळालेली आहे. त्याकामी येणारे वार्षिक खर्चास रक्कम रुपये ४,४५,६२०/- (अक्षरी र.रू.चार लाख पंचेचाळीस हजार सहाशे वीस फक्त) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – विषय क्र.२३ दि.३१/०७/२०१७ पर्यंत मुदतवाढ देऊन मंजूर करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक –६०२ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – उद्यान/वृक्षसंवर्धन

सूचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२०१/२०१७ दि.३०/६/२०१७

विषय - वृक्षरोपणासाठी मोठी रोपे पुरविणे व लागवड करून १ वर्ष देखभाल करणेबाबत...

विषय क्रमांक २४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६०३ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – दुरसंचार

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.दुरसंचार/१/कावि/२५४/२०१७ दि.२९/०६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे एकूण २२ प्रभाग स्तरावरील उपविभाग विद्युत तक्रार निवारण केंद्राकरिता मोबाईल सिम सुविधा (फक्त ग्रुप कॉलिंग सुविधा – Level 2) पुरविणेसाठी मासिक भाडे र.रु.४१/- + सेवाकरा प्रमाणे (र.रु.४१/- + सेवाकर र.रु.६/- = ४७/- x २२ ठिकाणे = र.रु.१०३४ x १२ महिने = वार्षिक र.रु.१२,४०८/- अंदाजे खर्च) येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६०४ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/३९१/२०१७ दि.२८/६/२०१७

विषय – मनपाचे उद्यानात व मैदानात ओपन जिमचे साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक २६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६०५ विषय क्रमांक – २७

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/३/कावि/१३१/२०१७ दि.३०/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.जिल्हाधिकारी यांचेकडील संदर्भिय पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रांमार्फत महसूल विभागाच्या सेवा पुरविणेसाठी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.मांतंस/२०१२/प्र.क्र.१५२/३९ दि.२३/५/२०१२ अन्वये नागरी सुविधा केंद्रांमार्फत देण्यात येणा-या सेवांमधून प्राप्त झालेल्या महसूलाचे वाटप खालीलप्रमाणे करणेबाबत नमूद केलेले आहे.

| सेवेचा दर रू. + सेवा कर अतिरिक्त | राज्य सेतू सोसायटी | महा ऑनलाईन | जिल्हा सेतू | राज्य केंद्रचालक संस्था आणि गावपातळीवर केंद्र चालविणारा उद्योजक |
|---|---|---|---|---|
| **20.00** | **1.00** | **2.00** | **4.00** | **13.00** |

महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रांमार्फत महसूल विभागाच्या सेवा उपलब्ध करणेसाठी महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रचालकास महसूल विभागाच्या कार्यालयात न जाता सदरची सेवा ही जिल्हाधिकारी कार्यालयाने नेमणूक केलेल्या सेतू मार्फत उपलब्ध होणार असल्याने महसूल विभागांच्या सेवांकरिता प्रति अर्ज रक्कम रू.२०/- + जिल्हाधिकारी कार्यालयाने नेमणूक केलेल्या सेतू कार्यालयास रक्कम रू.१३/- असे एकूण रक्कम रू.३३/- + सेवा कर इतके शुल्क नागरिकांकडून आकारण्यात येणार आहे. व त्याचे विभाजन खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे.

| सेवेचा दर रू. + सेवा कर अतिरिक्त | नागरी सुविधा केंद्रचालक | SCA (मनपा) | महा ऑनलाईन | राज्य सेतू सोसायटी | जिल्हा सेतू | मे. जे. एम. के. इन्फोकॉम (सेतू) |
|---|---|---|---|---|---|---|
| **33.00** | **10.40** | **0.60** | **4.00** | **1.00** | **4.00** | **13.00** |

सदरचे अतिरिक्त रक्कम रू.१३/- हे फक्त महसूल विभागाच्या सेवांकरिताच आकारण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महाऑनलाईन यांस प्रति अर्ज रक्कम रू.४.०० व जिल्हा सेतू समितीस रक्कम रू.४.००/- इतके शुल्क वाटप करावे लागणार असल्याने महापालिकेस रक्कम रू.२.६० ऐवजी रू.०.६० पैसे प्रति अर्ज प्राप्त होणार आहेत. यांस तसेच महापालिकेच्या सेवा आकुर्डी तहसील कार्यालय, सेतू यांना मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.५४६८ दि.३१/१२/२०१३ अन्वये मंजूर दराने महापालिका सेवांचे अर्ज स्विकृती व कामकाज करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६०६ विषय क्रमांक – २८
दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१३६/२०१७ दि.२८/६/२०१७

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.04-2016/17 मधील अ.क्र. 33 अन्वये संत तुकारामनगर प्रेक्षागृहातील जनित्र संचाची सन 2016-17 मध्ये वार्षिक देखभाल दुरूस्ती करणेकामी मे.रिलायबल डिझेल सर्व्हिसेस नि.र.रू.3,39,761/- (अक्षरी र.रू.तीन लाख एकोणचाळीस हजार सातशे एकसष्ट फक्त) पेक्षा 24.99% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६०७ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१३५/२०१७ दि.२८/६/२०१७

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.04-2016/17 मधील अ.क्र.25 अन्वये संत तुकारामनगर प्रेक्षागृहातील विद्युतीकरणाची देखभाल दुरूस्ती करणेकामी मे.रिलायबल डिझेल सर्व्हिसेस नि.र.रू.2,79,657/- (अक्षरी र.रू.दोन लाख एकोणऐंशी हजार सहाशे सत्तावन्न फक्त) पेक्षा 17.00% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक –६०८ विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०५/०७/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.लक्ष्मण उंडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिघी,बोपखेल,गणेशनगर,भोसरी,च-होली, वडमुखवाडी इत्यादी ठिकाणी ५००० ते ६००० माजी सैनिकांची कुटुंबे वास्तव्यास आहेत. दिघी येथे माजी सैनिक विकास संघ, दिघी ही संघटना माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी व त्यांच्या परिवाराच्या कल्याणाकरीता कार्यरत आहे. यापैकी बहुतांश माजी सैनिक पेशन्ट आहेत. त्यांच्या परिवारासाठी मिळणा-या कल्याणकारी योजना त्यांच्या अडीअडचणी व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी माजी सैनिक विकास संघ कार्य करीत आहे.

तसेच बहुतांश माजी सैनिक, विधवा वयोवृद्ध असल्याने जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय व मिलट्री हॉस्पीटलमध्ये जाणेसाठी शारिरिक व मानसिक दृष्टीने अडचणी निर्माण होतात व वेळेचाही अपव्यय होतो या कारणासाठी बहुउद्देशीय इमारती दोन मजले मिळणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत दिघी येथील दत्तनगर या ठिकाणी महापालिकेमार्फत तीन मजली बहुउद्देशीय इमारतीचे काम चालु आहे. माजी सैनिकांनी देशासाठी केलेली सेवा लक्षात घेऊन तसेच शहीद जवानाच्या परिवाराच्या कल्याणासाठी महानगरपालिकेने ही काही हातभार लावणे गरजेचे आहे.

त्यादृष्टीने माजी सैनिक व त्यासाठी माजी सैनिक विकास संघाची नोंद व त्यांचे परिवारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र (ECSC), सुसज्ज कार्यालय तसेच माजी सैनिकांचे मुलांसाठी UPSC/MPSC स्पर्धा परिक्षा तसेच इतर व्यावसायिक प्रशिक्षण देणेसाठी प्रशिक्षण केंद्र उभारणेकरिता सामाजिक बांधिलकी म्हणून दिघी येथील दत्तनगर याठिकाणी महापालिकेमार्फत बांधणेत येत असलेली बहुउद्देशीय इमारत माजी सैनिक विचार संघ, दिघी यांना विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६०९ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०५/०७/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत इ.१० वी व १२ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस रक्कम देणे ही योजना कार्यरत आहे. सदर योजनेत खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी.

अ) इ.१० वी मध्ये ८०% ते ९०% गुण प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना र.रु.१०,०००/- व
   ९० % पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विद्यार्थ्यांना र.रु.१५,०००/-

ब) इ.१२ वी मध्ये ८०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विद्यार्थ्यांना र.रु.१५,०००/-

सदरचा विषय हा धोरणात्मक असल्याने ही योजना सुरु करणेकामी विलंब होऊ नये यासाठी मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या दुरुस्तीसह सदरच्या योजनेची अंमलबजावणी करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –६१० विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०५/०७/२०१७ विभाग - पशुवैद्यकिय

सूचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. पवै/१/कावि/२५३/२०१७ दि.५/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात पशुजन्म नियंत्रण कार्यक्रम राबविणेकामी उपलब्ध संस्था मे.पिपल फॉर ॲनिमल, पुणे या संस्थेस यापुर्वी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीस अधिन राहुन पुर्वीचेच दराने म्हणजे र.रु.६४९ प्रति केस (नर/मादी) प्रमाणे नविन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन संस्थेची नेमणुक होईपर्यंत २ महीने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६११ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०५/०७/२०१७ विषय – आपत्ती व्यवस्थापन
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. आप.व्य/०१/कावि/१४५/२०१७ दि.४/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

श्री.अनिल गुलाबराव कदम,मुख्य समन्वयक, यांना मुदत संपुष्टात येत असलेचे दिवसानंतर १ दिवस सेवा खंडीत करून पुढील ३ महिने कालावधीकरीता मुदतवाढ व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्च रक्कम रुपये ६०,०००/- फक्त (प्रतिमहा २०,०००/- प्रमाणे ३ महिने) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५२/२०१७
दिनांक - १५/०७/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.